# विद्यार्थी साहाय्यक समिती, पुणे

Vidyarthi Sahayyak Samiti, Pune




## वार्षिक अहवाल २०२२-२३

www.samiti.org

# विश्वस्त मंडळ




**पद्मश्री**
**प्रताप पवार**
अध्यक्ष



**डॉ. भाऊसाहेब जाधव**
कार्याध्यक्ष,
मराठवाडा मित्रमंडळ, पुणे



**विजय पुसाळकर**
अध्यक्ष, इंडो-शॉटले
प्रा. लि.



**तुकाराम गायकवाड**
कार्यकारी विश्वस्त,
उद्योजक



**संजय अमृते**
खजिनदार,
बँकिंग व वित्त क्षेत्र




**तुषार रंजनकर**
उद्योजक



**सुप्रिया केळवकर**
शिक्षणतज्ज्ञ



**तेज निवळीकर**
माजी मानद संचालक,
बहि:शाल शिक्षण मंडळ, सा. फु. पुणे विद्यापीठ



**रत्नाकर मते**
अभियांत्रिकी सल्लागार



**सुनंदा माने**
संचालक, लाही



**जिभाऊ शेवाळे**
बँक अधिकारी



**राजेंद्र ततार**
समुपदेशक

# संस्थापक




संस्थापक

**डॉ. अच्युत शंकर आपटे**



**सुमित्रा  केरकर**



**हरिभाऊ फाटक**

## समितीचे घोषवाक्य

- सर्वांगीण शिक्षणातून युवा सक्षमीकरण

## ध्येय (Mission)

- समाजाच्या मदतीने आर्थिकदृष्ट्या गरजू आणि होतकरू युवकांच्या सक्षमीकरणासाठी योग्य सुविधा व संधी उपलब्ध करून देणे

## समितीचे धोरण

- योग्य व्यवस्थापन व गुणवत्तापूर्ण कार्यप्रणाली
- शालेय शिक्षणानंतर शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या युवावर्गाची भोजन व निवासाची उत्तम सोय करणे
- समितीची मूल्ये रुजविणे
- जात, धर्म, पंथ निरपेक्ष विकास
- कालानुरूप विविध कौशल्ये विकसित करण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे
- युवकांच्या सक्षमीकरणासाठी व उद्योजकता रुजविण्यासाठी प्रयत्न करणे
- सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव असलेल्या व्यक्ती आणि संस्था यांच्यातर्फे आर्थिक तथा सर्वंकष पाठबळ मिळविण्याचे सतत प्रयत्न करणे.

## मूल्ये

- स्वच्छता
- समता
- श्रमप्रतिष्ठा
- स्वावलंबन
- व्यक्तिमत्त्व विकास
- समाजाप्रती उत्तरदायित्व

## हेतू

- उच्चशिक्षणासाठी पुण्याला येणाऱ्या गरजू व होतकरू ग्रामीण विद्यार्थ्यांना अत्यल्प दरात वसतिगृह व भोजन यांची उत्तम सुविधा पुरवणे. दुर्बल घटकांतील विद्यार्थी आत्मविश्वासपूर्ण, स्वावलंबी व समाजाचा जबाबदार घटक व्हावेत, यासाठी पोषक वातावरण व तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे. त्यातून सामाजिक स्तर उंचावणे.



# समितीचे कार्य



ग्रामीण भागातून उच्च शिक्षणासाठी पुण्यात येणाऱ्या गरीब, हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी अल्पदरात निवासाची व भोजनाची सोय व्हावी व त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा यासाठी विद्यार्थी साहाय्यक समिती प्रामुख्याने काम करते. बदलत्या आर्थिक – सामाजिक स्थितीचा विचार करता या विद्यार्थ्यांना नोकरीयोग्य होण्याबरोबरच किमान १० टक्के विद्यार्थ्यांना उद्योजकतेकडे वळविण्यासाठी प्रोत्साहन देणे, मार्गदर्शन करणे हाही समितीचा उद्देश आहे. हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून समितीच्या कामाकडे पाहिले जाते. समिती धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणीकृत (क्र. २१९ ई, पुणे) असून संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण भारतभर आहे.

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल परंतु गुणवत्तेच्या जोरावर काहीतरी ध्येय ठेवून धडपडणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींना मदतीच्या हेतूने ज्येष्ठ गणितज्ज्ञ डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्यसेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी १९५५ मध्ये या कामाला सुरुवात केली. त्यावेळी स. प. महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालयात जेवणाच्या क्लबमध्ये विद्यार्थ्यांसाठी जेवण सुरू केले. पुढे निवासव्यवस्था वाढविली, सध्या विद्यार्थ्यांसाठी तीन व विद्यार्थिनींसाठी दोन अशी संस्थेची पाच वसतिगृहे असून त्यांतून सुमारे ७५० विद्यार्थी–विद्यार्थिनी या सुविधांचा लाभ घेत आहेत. अहमदनगर येथेही समितीची दोन वसतिगृहे पुढील वर्षभरात सुरू होत आहेत. साहाय्यदात्यांकडून मिळणाऱ्या आर्थिक साहाय्यावर आणि विद्यार्थ्यांकडून येणाऱ्या अल्प शुल्कावर संस्थेचा योगक्षेम सुरू आहे. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा ही संस्थेची त्रिसूत्री आहे. देशासाठी जबाबदार नागरिक घडवणे यासाठी संस्थेचे अखंड प्रयत्न सुरू आहेत. प्रत्येक सत्रात प्रवेशासाठी जागा उपलब्ध असतात. डिप्लोमा, आयटीआय, बारावी नंतरच्या पदवीपर्यंतच्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश असतो.

## मुलींची संख्या वाढते आहे

सध्या ७५० विद्यार्थ्यांची व्यवस्था आहे. त्यात मुली ३२० आहेत. मात्र गेल्या काही वर्षांपासून पुण्यात उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या मुलींची संख्या वाढत असल्याने पुण्यात अजून एक मुलींसाठी नवीन वसतिगृह उभारणी सुरू केली आहे. या वसतीगृहात आणखी ३३६ मुलींसाठी सुविधा उपलब्ध होईल. जून २०२४ मध्ये मुलींना प्रवेश देता येईल असे प्रयत्न आहेत.

## विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम

पहाटे योगासने, संस्थेसाठी रोज अर्धा तास श्रमदान, कमवा व शिका योजनेतील सहभाग, देणगीदार पालकांची महिन्यातून एकदा भेट या गोष्टी विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य असतात. वाचनालय व अभ्यासिका संगणक प्रशिक्षण व सराव, लॅपटॉप लायब्ररी, वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत. शिवाय खेळ, मान्यवरांची व्याख्याने, गटचर्चा, सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धा, उद्योजकता विकास यातून त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास घडविण्याचा प्रयत्न केला जातो.

## समाजाचा विश्वास

सहा दशकांहून अधिक काळ सुरू असलेल्या या कार्याला समाजाचा मोठा आर्थिक पाठिंबा आहे. कोणत्याही शासकीय मदतीवर अवलंबून न राहता केवळ समाजाच्या मदतीवरच हे कार्य सुरू राहावे, अशी संस्थापकांची इच्छा होती. काही साहाय्यदाते पिढ्यानपिढ्या संस्थेशी जोडलेले आहेत. पारदर्शी कारभार आणि युवा परिवर्तनाच्या कार्यामुळे आपल्या मदतीचा योग्य विनियोग साहाय्यदाते अनुभवू शकतात.


# मुलींसाठी नव्या वसतिगृहांची उभारणी

**प्रताप पवार,** अध्यक्ष

हे वर्ष समितीच्या दृष्टीने विविध आघाड्यांवर यशस्वी ठरले. अहमदनगर येथे दोन वसतिगृहांचे भूमिपूजन झाले. अलिबाग येथे पहिल्यांदाच कार्यकर्त्यांनी कार्यशाळा घेऊन समितीच्या ध्येय–धोरणांविषयी, उद्दिष्टांविषयी काही दिशा निश्चित केली. समितीच्या विद्यार्थ्यांनी दिवाळीच्या सुटीत आपापल्या भागात समितीची माहिती सांगून विक्रमी सुमारे १८ लाखांचे निधी संकलन केले. समितीची ग्रंथालये अत्याधुनिक झाली, समितीचे विद्यार्थी शिकून नोकरीयोग्य होण्याबरोबरच उद्योजक व्हावेत या हेतूने उद्योगातील सुमारे १०० माजी विद्यार्थ्यांची एक परिषद आयोजित करून या विद्यार्थ्यांना दिशा दर्शनाचा प्रयत्न केला. त्या अनुषंगाने 'गर्जे मराठी' या अमेरिकास्थित जागतिक संस्थेसोबत सामंजस्य करार झाला. विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी 'गर्जे मराठी'च्या रुपाने आता आंतरराष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध झाले आहे, ही फार समाधानाची गोष्ट आहे. नवनवीन तंत्रज्ञानाचा स्पर्श विद्यार्थ्यांना व्हावा, असा समितीचा प्रयत्न पुढील काळात असेल.

समितीचे कार्य आता सर्वदूर पोचते आहे. ग्रामीण भागातील हजारो गरजू आणि होतकरू विद्यार्थी समितीच्या भरवशावर पुण्यात उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न पाहतात. त्यात मुलींची संख्या वाढते आहे. स्पर्धेच्या काळात पुण्यासारख्या ठिकाणी प्रवेश मिळण्यापासून त्यात यश संपादन करण्यापर्यंत मुलींचा टक्का वाढतो आहे आणि पर्यायाने समितीची जबाबदारीही. मर्यादित जागांमुळे अनेक मुलींना प्रवेश नाही, असे सांगावे लागत होते, परंतु यावर मार्ग काढण्याचा निर्णय घेऊन केवळ मुलींसाठी पुण्यात अजून एका नवीन वसतिगृहाचे आणि पुण्याबाहेर प्रथमच अहमदनगर येथेही मुलींसाठी एक आणि मुलांसाठी एक अशा दोन वसतिगृहांच्या उभारणीचे काम सुरू केले. वर्षभरात या वसतिगृहांतून सुमारे ४०० मुलींची आणि १२० मुलांची नव्याने सोय होऊ शकणार आहे. पूर्वपुण्याईमुळे आर्थिक मदतीचे अनेक हात पुढे येत आहेत. इमारती आणि इतर सुविधा उपलब्ध होतील, परंतु एक विद्यार्थी वाढला की आजघडीला २८००० रुपयांची तूट येते. त्यासाठी आर्थिक मदतीची संस्थेला गरज भासतेच आहे.

विद्यार्थ्यांना फुकट काही द्यायचे नाही, परंतु परवडणाऱ्या दरात उच्च प्रतिच्या सुविधा उपलब्ध करायच्या. आपण जोपर्यंत चांगले काम करतो आहोत, तोपर्यंत पैसे कमी पडणार नाहीत, असे समितीचे संस्थापक अच्युतराव आपटे नेहमी म्हणत असत. त्याचा अनुभव आम्ही घेत आहोत. तीन तीन पिढ्या आर्थिक मदत करणारे अनेक सुहृदयी संस्थेशी जोडलेले आहेत. आपण समाजाचे काही देणे लागतो, या भावनेतून विविध क्षेत्रांतील अभ्यासू लोक कार्यकर्ते म्हणून संस्थेसाठी विनामूल्य वेळ देत आहेत. समितीविषयीच्या कृतज्ञतेच्या भावनेतून माजी विद्यार्थी संस्थेकडे परत य़ेत आहेत. या सर्वांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना अल्पदरात सुविधा उपलब्ध करणे समितीला शक्य होत आहे. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीनुसार युवापरिवर्तनातून जबाबदार नागरिक घडविण्याचा समितीचा ध्यास आहे. आपल्यासारखे अनेक सृजन सोबत आहेत, म्हणून हे शक्य होत असल्याची कृतज्ञ जाणीव आमच्या मनात आहे.



# बदलत्या काळाचा विचार



**तुकाराम गायकवाड,**

कार्यकारी विश्वस्त

'आम्ही एका चांगल्या संस्थेशी जोडलो गेलो, याचा आनंद आहे.', 'आमची छोटीशी मदत या विधायक कार्यात उपयोगी पडते, याचे समाधान आहे.अशा देणगीदार, हितचिंतकांच्या प्रतिक्रिया आम्हाला उभारी देतात, विद्यार्थ्यांच्या परिवर्तनाचे काम करण्यास अजून बळ देतात.

विद्यार्थी साहाय्यक समितीचे काम विस्तारत आहे. समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील तज्ज्ञ, अनुभवी लोक या कार्याशी जोडले जात आहेत, याचा आनंद आहे. या चांगल्या कामाची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यत पोचावी म्हणून आम्ही सोशल मीडियाचा वापर वाढवला आहे. गेल्यावर्षी प्रवेशप्रक्रिया ऑनलाइन केली. २५० जागांसाठी जवळपास १७०० अर्ज आले. हा याचा परिणाम आहे. सोशल मीडियाच्या वापरामुळे समितीचे काम साता-समुद्रापारही पोचले आहे. देश विदेशातील अनेक मराठी बांधवांनी हे काम पाहून खूप चांगल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. भारतात आल्यावर काहींनी संस्था पाहायला अवश्य भेट दिली. आपापल्या परिवारात त्याची चर्चा केली आणि पहिल्यांदाच डॉलररूपाने समितीकडे भरीव देणगीचा ओघ सुरू झाला आहे. याकामी समितीच्या कार्यकर्त्यांचे सातत्यपूर्ण योगदानही खूप महत्वाचे आहे.

समितीचा विद्यार्थी म्हणजे गुणवान, सुसंस्कारित, असा समाजाचा विश्वास आहे. त्यासाठी जे उपक्रम राबविले जातात त्याला अनेक मदतीचे हात पुढे आलेले आहेत. संस्थापकांनी आखून दिलेल्या चौकटीतच आजही हे काम सुरू आहे. सीएसआरच्या माध्यमातून नवनवीन कंपन्या समितीशी जोडल्या जात आहेत. आर्थिक मदतीबरोबर विद्यार्थ्यांना बदलत्या काळातील गरजेचे मार्गदर्शन, प्रशिक्षणाच्या संधी लाभत आहेत. केवळ कमी खर्चात निवास आणि भोजन हा विचार न करता श्रमसंस्काराचे, नैतिकतेचे, चारित्र्य घडणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देऊन जबाबदार नागरिक घडविण्याचे काम समिती करते आहे. या संस्काराचा लाभ घेऊन बाहेर पडलेले हजारो विद्यार्थी याची साक्ष आहेत. संस्थेबद्दलच्या प्रेमातून ते कार्याशी पुन्हा जोडले जात आहेत.

ग्रामीण भागातील मुला-मुलींची पुण्यासारख्या शहरात उच्च शिक्षणासाठी किंवा नवनव्या अभ्यासक्रमांसाठी येण्याची संख्या वाढते आहे. त्यातील गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना समितीसारख्या संस्थांची मोठी गरज आहे. त्यातही मुलींची पुण्यासारख्या शहरात मोठी अडचण होते म्हणून समितीने मुलींसाठी शिवाजी हाउसिंग सोसायटीजवळील समितीच्या जागेत नव्या वसतिगृहाच्या उभारणीला सुरुवात केली आहे. तसेच पहिल्यांदाच पुण्याबाहेर अहमदनगर येथेही दोन वसतिगृहे वर्षभरात उभी राहत आहेत. थिंक टँकमधून पुढील पाच वर्षांसाठी काही उद्दिष्टे निश्चित केली आहेत. मुलांना सुविधा उपलब्ध करतानाच उद्योगांना काय लागते त्याचा विचार करून त्यादृष्टीने मुलांच्या कौशल्यविकासाचा विचारही सुरू आहे. समितीचे किमान १० टक्के विद्यार्थी उद्योजक व्हावेत असे धोरण ठरवून त्यादृष्टीने वाटचाल सुरू आहे. पुण्यातील दे आसरा, भाऊ फाउंडेशन, अमेरिकेतील गर्जे मराठी या संस्था यासाठी सोबत आहेत. समितीबाहेरच्या विद्यार्थ्यांसाठीही अभ्यासिका, भोजनसुविधा असे काय काय करता येईल, यावर विचार आणि प्रयत्न सुरू आहेत. आपल्या सर्वांचे सहकार्य आहेच. एकत्रित प्रयत्नांतून निश्चित हे सर्व साध्य करता येईल, हा विश्वास आहे.

# वसतीगृहातील विद्यार्थी संख्या



डॉ. अच्युत शंकर आपटे (मुली) १८०




सुमित्रा सदन (मुली) १४२



लजपतराय विद्यार्थी भवन (मुले) ११३



पी. डी. कारखानीस (मुले) १७८






हरिभाऊ फाटक (मुले) ११६

## जिल्हानिहाय विद्यार्थी संख्या

| क्र. | जिल्हा | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | अहमदनगर | ३१ | ६७ | ९८ |
| २ | अकोला | ३ | ५ | ८ |
| ३ | अरुणाचल प्रदेश | १ | ० | १ |
| ४ | अमरावती | ७ | २ | ९ |
| ५ | औरंगाबाद | १६ | १८ | ३४ |
| ६ | बीड | १५ | २३ | ३८ |
| ७ | भंडारा | २ | ३ | ५ |
| ८ | बुलढाणा | ५ | १४ | १९ |
| ९ | चंद्रपूर | ० | ० | ० |
| १० | धाराशिव | २२ | १५ | ३७ |
| ११ | धुळे | २ | ९ | ११ |
| १२ | गडचिरोली | ५ | ० | ५ |
| १३ | गोंदिया | २ | ४ | ६ |
| १४ | गुलबर्गा (कर्नाटक) | ० | १ | १ |
| १५ | हिंगोली | १ | १२ | १३ |
| १६ | जळगाव | १० | ८ | १८ |
| १७ | जालना | ४ | ९ | १३ |
| १८ | कोल्हापूर | ० | २ | २ |
| १९ | लातूर | ७ | २२ | २९ |

## अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थी संख्या


| क्र. | अभ्यासक्रम | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | बी.ए. | १६ | २२ | ३८ |
| २ | बी. बी. ए. | ७ | ६ | १३ |
| ३ | बी. कॉम. | ४८ | ४३ | ९१ |
| ४ | बी. सी. एस. | ५ | १५ | २० |
| ५ | बी. ई. | ४१ | ९५ | १३६ |
| ६ | बी. एस. सी. | ५१ | ५९ | ११० |
| ७ | बी. ए. एल. एल. बी. | ७ | १० | १७ |
| ८ | डिप्लोमा | ८५ | ११८ | २०३ |
| ९ | अकरावी कला | २ | ० | २ |
| १० | बारावी वाणिज्य | ० | ० | ० |
| ११ | बारावी विज्ञान | ४ | २ | ६ |
| १२ | बी. टेक | ४ | ३ | ७ |
| १३ | एम. एस. सी. | ५ | ० | ५ |
| १४ | फिजिओथेरपी | ० | ३ | ३ |
| १५ | बी. ए.एम. एस. | १५ | ० | १५ |
| १६ | आय. टी. आय. | १ | ८ | ९ |
| १७ | एम. ए. | १ | ० | १ |
| १८ | बी. फार्म. | ६ | ४ | १० |
| १९ | बी. सी. ए. | ११ | १५ | २६ |
| २० | एम. एस. डब्ल्यू. | ३ | ० | ३ |
| २१ | बी. व्होक | १ | १ | २ |
| २२ | सरफेसकोटिंग | २ | ० | २ |
| २३ | बी. एस. सी. नर्सिंग | ५ | २ | ७ |
| २४ | इंटेरिअर डिझाईन | २ | १ | ३ |
| | एकूण | ३२२ | ४०७ | ७२९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | मुंबई | ४ | ३ | ७ |
| २१ | नागपूर | ० | ० | ० |
| २२ | नांदेड | ४ | ११ | १५ |
| २३ | नंदुरबार | ० | ३ | ३ |
| २४ | नाशिक | ६ | ६ | १२ |
| २५ | परभणी | ८ | ८ | १६ |
| २६ | पालघर | २ | ० | २ |
| २७ | पुणे | ११८ | १०३ | २२१ |
| २८ | रायगड | १ | ३ | ४ |
| २९ | रत्नागिरी | ५ | १० | १५ |
| ३० | सांगली | ३ | २ | ५ |
| ३१ | सातारा | १३ | १६ | २९ |
| ३२ | सिंधुदुर्ग | १ | ० | १ |
| ३३ | सोलापूर | १४ | २४ | ३८ |
| ३४ | ठाणे | ० | १ | १ |
| ३५ | वर्धा | ३ | ० | ३ |
| ३६ | वाशिम | १ | १ | २ |
| ३७ | यवतमाळ | ५ | २ | ७ |
| ३८ | झारखंड | १ | ० | १ |
| | एकूण | ३२२ | ४०७ | ७२९ |

# महाविद्यालयनिहाय विद्यार्थी संख्या

| क्र. | महाविद्यालय | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | आबासाहेब गरवारे कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड सायन्स | १० | ७ | १७ |
| २ | आबासाहेब गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स | ९ | ७ | १६ |
| ३ | अभिनव कला महाविद्यालय | २ | १ | ३ |
| ४ | एबीएमएसपीज वाय. सी. लॉ कॉलेज, पर्वती | ४ | ० | ४ |
| ५ | आबेदा इनामदार सिनीअर कॉलेज | ५ | ० | ५ |
| ६ | एआयएसएसएमएस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | ६ | १९ | २५ |
| ७ | एआयएसएसएमएस कॉलेज ऑफ फार्मसी | ५ | २ | ७ |
| ८ | एआयएसएसएमएस पॉलेटेकनिक | २ | ० | २ |
| ९ | एआयएसएसएमएस इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी | ८ | ५ | १३ |
| १० | अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय | २ | ० | २ |
| ११ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय, औंध) | २ | १ | ३ |
| १२ | बाबुरावजी घोलप महाविद्यालय | २ | १ | ३ |
| १३ | भारती विद्यापीठ इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी | ० | ३ | ३ |
| १४ | भारती विद्यापीठ सोशल सायन्स सेंटर | ९ | ३ | १२ |
| १५ | बृहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स | ११ | ७ | १८ |
| १६ | कुसरो वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी | ४ | १ | ५ |
| १७ | डीईएस सोसायटीज एस. के. जिंदाल कॉलेज ऑफ नर्सिंग | २ | १ | ३ |
| १८ | फ्रेम बॉक्स २.० ॲनिमेशन | ४ | ० | ४ |
| १९ | फर्ग्युसन महाविद्यालय | ४५ | ४२ | ८७ |
| २० | गोखले इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स | १ | ० | १ |
| २१ | गेनबा सोपानराव मोझे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | १ | २ | ३ |
| २२ | शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय | ७० | १०६ | १७६ |
| २३ | एच. व्ही. देसाई कॉलेज, पुणे | ४ | ४ | ८ |
| २४ | महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी | ० | १ | १ |
| २५ | मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स | ५ | २६ | ३१ |
| २६ | मराठवाडा मित्र मंडळ शंकरराव चव्हाण लॉ कॉलेज | ५ | ११ | १६ |
| २७ | मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कर्वेनगर | ० | ३ | ३ |
| २८ | मामासाहेब मोहोळ कॉलेज, कोथरूड | १ | २० | २१ |
| २९ | मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट, सायन्स ॲण्ड कॉमर्स, गणेशखिंड | २० | १७ | ३७ |
| ३० | मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट, सायन्स ॲण्ड कॉमर्स, शिवाजीनगर | ३८ | २८ | ६६ |
| ३१ | मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शिवाजीनगर | २२ | ४६ | ६८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३२ | मॉडर्न लॉ कॉलेज, गणेशखिंड | ० | २ | २ |
| ३३ | मॉडर्न कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, शिवाजीनगर | ० | १ | १ |
| ३४ | मुकबधीर शिक्षण संशोधन केंद्र, डेक्कन | ३ | ५ | ८ |
| ३५ | नवलमल फिरोदिया लॉ कॉलेज ऑफ पुणे | २ | १ | ३ |
| ३६ | नौरोजी वाडिया कॉलेज | १ | १ | २ |
| ३७ | पी. जी. मोझे कॉलेज, वाघोली | ० | १ | १ |
| ३८ | जेएसपीएम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, वाघोली | ० | १ | १ |
| ३९ | पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, रावेत | १ | १ | २ |
| ४० | पुणे विद्यार्थीगृह कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | १ | ३ | ४ |
| ४१ | सिंहग़ड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | ३ | ६ | ९ |
| ४२ | श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पर्वती | १ | ० | १ |
| ४३ | सर परशुरामभाऊ महाविद्यालय | ७ | १३ | २० |
| ४४ | एस. एन. डी.टी. कॉलेज ऑफ होमसायन्स, कर्वेरोड | २ | ० | २ |
| ४५ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | ० | १ | १ |
| ४६ | सूर्यदत्त कॉलेज ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी, सदाशिव पेठ | ० | १ | १ |
| ४७ | महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | १ | ० | १ |
| ४८ | आयएलएस लॉ कॉलेज | ० | १ | १ |
| ४९ | टिळक विद्यापीठ | ० | १ | १ |
| ५० | विश्वकर्मा इन्स्टिट्युट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी | ० | २ | २ |
| ५१ | बी. जे. मेडिकल कॉलेज | १ | २ | ३ |
| | **एकूण** | **३२२** | **४०७** | **७२९** |




एकूण विद्यार्थी संख्या
(३१ मार्च २०२३)

इतर राज्यांमधून

मुली : ०२

मुले : ०१

**मुली : ३२२ मुले : ४०७ एकूण : ७२९**

# वर्षभरातील उपक्रम



## नगरमध्ये वसतिगृहांचे भूमिपूजन

अहमदनगर येथे मुलांसाठी एक आणि मुलींसाठी एक अशा दोन वसतिगृहांचे भूमिपूजन झाले. मुलांसाठीच्या वसतिगृहाचे भूमिपूजन १४ ऑगस्ट २०२२ ला उद्योजक विनोद जाधव यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला ग्रेनडा प्रांताच्या दुबईतील राजदूत रोज अँन बेंजामिन उपस्थित होत्या. विनोद जाधव यांच्या आर्थिक मदतीतून हे वसतिगृह बांधण्यात येणार आहे. यामध्ये १२० मुलांची सोय होणार आहे.



मधुभाऊ चौधरी मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीचे भूमिपूजन २७ सप्टेंबर २०२२ रोजी उद्योजक प्रमोद चौधरी यांच्या हस्ते झाले. परिमल आणि प्रमोद चौधरी फाउंडेशनच्या आर्थिक सहयोगातून हे वसतिगृह उभारण्यात येत आहे. येथे ६० मुलींची सोय होणार आहे.

## 'गर्जे मराठी'बरोबर सामंजस्य करार

'गर्जे मराठी'या अमेरिकास्थित संस्थेबरोबर विद्यार्थी साहाय्यक समितीचा सामंजस्य करार झाला. या अंतर्गत समितीच्या विद्यार्थ्यांसाठी एकलव्य उपक्रमांतर्गत मान्यवरांची व्याख्याने उपलब्ध होत आहेत. उद्योजकतेविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभणार आहे. डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहात झालेल्या या कार्यक्रमात गर्जे मराठी संस्थेचे आनंद गानू, माधव दाबके, समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड, कार्यकर्ते उपस्थित होते.

## डॉ. दीक्षित यांचा विद्यार्थ्यांशी संवाद

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना विद्यार्थी साहाय्यक समितीतील विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचा मंत्र डॉ. जगन्नाथ दीक्षित यांनी दिला. त्यांच्या हस्ते झेंडावंदन झाले. त्यानंतर त्यांनी दीक्षित डाएटचे मर्म उलगडून दाखवले.

## कवयित्री डॉ. संगीता बर्वे यांचा सत्कार

समितीच्या माजी विद्यार्थिनी, बालसाहित्यकार,कवयित्री डॉ. संगीता बर्वे यांच्या 'पियूची वही' यापुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. त्या निमित्ताने समिती परिवाराच्या वतीने ८ ऑक्टोबरला विश्वस्त भाऊसाहेब जाधव यांच्या हस्ते मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यातआला. समिती परिवाराच्या वतीने माहेरची साडी त्यांना भेट दिली.





## श्रीधर फडके यांची गीतांची मैफल

समितीच्या स्थापनादिनानिमित्त साहाय्यदाते, हितचिंतक, स्नेहीजनांसाठी प्रसिद्ध गायक-संगीतकार श्रीधर फडके यांचा 'बाबूजी आणि मी' हा भावगीत आणि भक्तीगीतांचा कार्यक्रम २० नोव्हेंबरला गरवारे महाविद्यालयाच्या हॉलमध्ये झाला. श्रीधर फडके यांच्यासह शिल्पा पुणतांबेकर, शेफाली कुलकर्णी यांनी गायिलेल्या गीतांनी ही मैफल उत्तरोत्तर रंगत गेली. क्रिसेंट म्युच्युअल फंड डिस्ट्रिब्युटर्स प्रा. लि. चे भूषण वाणी यांना यावेळी सन्मानित करण्यात आले.

## अलिबागला कार्यकर्त्यांची कार्यशाळा

समितीच्या भविष्यकालीन धोरणांविषयी ४ व ५ जूनला अलिबागमध्ये कार्यकर्त्यांची कार्यशाळा झाली. पहिल्यांदाच पुण्याबाहेर कार्यशाळेचा प्रयोग झाला कार्यशाळेला २३ सदस्य उपस्थित होते. कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड यांनी समितीच्या सद्यस्थितीची माहिती दिली. पुढील ५ वर्षांत काय करता येईल यावर विचारमंथन कार्यशाळेत झाले.

## वार्षिक दिनदर्शिका प्रकाशित

समितीची वार्षिक दिनदर्शिकेत तिथी, सणवार, महत्त्वाच्या व्यक्तींचे वाढदिवस तसेच विविध उपक्रमांची माहिती दिली. आर्ट पेपरवर ४ हजार प्रती छापल्या.

## योगदान देणाऱ्यांविषयी कृतज्ञता

समितीच्या स्थापनेत सहभागी असलेल्या आणि त्यानंतरही समितीच्या कामात मोठे योगदान देणाऱ्या व्यक्तींविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, त्यांच्या स्मृती जपण्यासाठी समितीतील विविध कक्षांना त्यांचे नाव देण्यात आले. समितीचे पदाधिकारी आणि संबंधित व्यक्तींचे कुटुंबीय यांच्या उपस्थित हे नामकरण कार्यक्रम झाले.

**ग्रंथालयाला शांताताईंचे नाव**

डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहातील नूतनीकरण केलेल्या ग्रंथालयाला संस्थापक सदस्य शांताताई मालेगावकर यांचे नाव देण्यात आले.१३ मे रोजी हा कार्यक्रम झाला.

**भोजनालयात आठवणी गिंडीसरांच्या**

डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहातील भोजनालयाला वसंतराव गिंडी यांचे नाव देण्यात आले. ता. १५ ऑगस्टला झालेल्या या नामकरण कार्यक्रमासाठी १०२ वर्षीय गिंडी सर स्वतः उपस्थित होते. समितीला देणगी म्हणून १ लाख रुपयांचा धनादेश स्वतः सही करून दिला.

**कार्यकर्ता कक्षात निर्मलाताईंच्या स्मृती**

संस्थापक आणि माजी कार्यकारी विश्वस्त निर्मलाताई पुरंदरे यांचे नाव डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहातील कार्यकर्ता कक्षाला देण्यात आले. यावेळी चित्रफितीच्या माध्यमातून निर्मलाताईंच्या कार्याची ओळख करून देण्यात आली.

**राजाभाऊ पटवर्धनांचे नाव कार्यालयाला**

अनंत विश्वनाथ ऊर्फ राजाभाऊ पटवर्धन यांनी समितीच्या कामात झोकून दिले. सन १९८१ पासून २००४ पर्यंत कार्यकारी विश्वस्तपदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. समितीच्या डॉ. अच्युतराव आपटे वसतिगृहातील तळमजल्यावरील कार्यालयाला त्यांचे नाव देण्यात आले.

**हरिभाऊ फाटक यांचे नाव**

२६ जानेवारी २०२३ रोजी नवीन लजपत वसतीगृहाला संस्थापक आणि ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक यांचे नाव देण्यात आले. यावेळी त्यांचे पुतणे, नातू उपस्थित होते.

# महत्त्वाचे उपक्रम

## विद्यार्थ्यांचा सदिच्छा समारंभ

सन २०२१– २२ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचा सदिच्छा समारंभ लजपत भवन येथे झाला. समितीचा लाभलेला सहवास आणि येथे झालेले संस्कार याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, भविष्यात या ऋणातून काही प्रमाणात का होईना उतराई होण्याचा प्रयत्न करू, असे अभिवचन देत विद्यार्थ्यांनी निरोप घेतला.

## सुमित्रा सदनमध्ये टेबल टेनिस सुविधा

सुमित्रा सदनमध्ये टेबल टेनिस सुविधा उपलब्ध झाली असून याचे उद्‌घाटन १६ सप्टेंबरला एकम ॲकॅडमीचे संस्थापक सुबोध कोरडे आणि समितीचे कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड यांच्या हस्ते झाले. टेबल टेनिस अकॅडमीच्या काही प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी खेळाचे प्रात्यक्षिक सादर केले.



## डॉ. प्रमोद मोघे यांचे व्याख्यान

जागतिक नदी दिनानिमित्त २६ सप्टेंबरला आपटे वसतिगृहामध्ये डॉ. प्रमोद मोघे यांचे 'एक कप चहाचं प्रदूषण' या विषयावर व्याख्यान झाले. अभ्यास करत असताना चौकस बुद्धीने विचार करून त्याद्वारे पर्यावरणात सकारात्मक बदल घडवण्याचे आवाहन डॉ. मोघे यांनी विद्यार्थ्यांना केले.

## विद्यार्थ्यांना नेतृत्व कौशल्याचे धडे

विद्यार्थी साहाय्यक समितीतील व्यवस्थापनाच्या विद्यार्थ्यांसाठी 'नेतृत्व कसं करावं?' या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळा १२ फेब्रुवारी रोजी फुलगाव येथील इन्व्हेस्टमेंट इन मॅन ट्रस्ट येथे झाली. कार्यशाळेत समितीच्या सर्व वसतिगृहांतील एकूण ४६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



## गांधी जयंतीनिमित्त प्रभातफेरी

राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थी विकास केंद्रांतर्गत व सामाजिक जाणीव प्रकल्पाद्वारे २ ऑक्टोबरला पथनाट्ये सादर करत जनजागृती प्रभातफेरी तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन केले. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी फेरीमध्ये सहभाग घेतला. सह्याद्री ब्लड बँकेच्या सहकार्याने लजपत भवन येथे झालेल्या शिबिरात ५२ जणांनी रक्तदान केले.





## समिती उद्योजक परिषदेचे आयोजन

करिअर आणि नोकऱ्या यांचे स्वरुप दिवसेंदिवस बदलत आहे. या बदलाला अनुसरूनच समितीने विद्यार्थ्यांना उद्योजक होण्यासाठी प्रोत्साहन देण्याकरता २५ डिसेंबरला समिती उद्योजक परिषद आयोजित केली होती. उद्योजक म्हणून यशस्वी झालेले समितीचे ९० माजी विद्यार्थी परिषदेला उपस्थित होते. विद्यार्थी साहाय्यक समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, प्राज इंडस्ट्रिजचे प्रमोद चौधरी यांनी दृकश्राव्य पद्धतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रातिनिधीक स्वरुपात मनीषा गोसावी, मंदार जोगळेकर,डॉ. हरिश पाटणकर, शंकर बारवे, जे. व्ही. ऊर्फ राजू इंगळे,तुकाराम गायकवाड या माजी विद्यार्थ्यांनी उद्योगातील यशस्वी वाटचालीचे सादरीकरण केले.



## रत्नागिरी, चिखलगावला सहल

दरवर्षीप्रमाणे यंदा १६ व १७ डिसेंबरला रत्नागिरी, गणपती पुळे, चिखलगाव येथे विद्यार्थी व्यवस्थापनाची सहल नेण्यात आली. एकूण ४७ विद्यार्थी व २ कर्मचारी सहलीत सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांची मुक्कामाची व जेवणाची व्यवस्था लोकमान्य पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट,चिखलगाव (लोकसाधना परिवार) येथे करण्यात आली होती.

## उलगडले सूर्यनमस्कारांचे महत्त्व

दीनानाथ रुग्णालयातील अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. मिलिंद मोडक यांनी सूर्यनमस्कारांचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. हा कार्यक्रम लजपत संकुलात ४ ऑक्टोबरला झाला.



## ‘मनोवेध‘प्रकल्प

सप्टेंबर २०२२ ते फेब्रुवारी २०२३ या काळात रोटरी–पुणे मेट्रो क्लब आणि महर्षी कर्वे संस्थेचे बाया कर्वे स्त्री संशोधन केंद्राच्या सहयोगाने मनोवेध प्रकल्प राबविण्यात आला. या प्रकल्पात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी मन, भावना, ध्येयनिश्चिती, संघर्ष, लिंगभाव, संवेदनीकरण, स्वातंत्र्य अशा विषयांवर ९ सत्रे झाली. १०७ विद्यार्थी–विद्यार्थिनींनी या प्रकल्पात सहभाग घेतला. ता. १५ फेब्रुवारीला प्रकल्पाचा समारोप झाला. प्रकल्पात सहभागी सर्वांना प्रमाणपत्र देण्यात आली.



## पर्यावरणपूरक झिरो बजेट गणेशोत्सव

समितीत दोन वर्षांनंतर यंदा गणेशोत्सव उत्साहात साजरा झाला. पर्यावरणपूरक आणि झिरो बजेट गणेशोत्सवात यंदा महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाच्या विठ्ठल भक्तीचे अतुट नाते आकर्षक देखाव्यांच्या माध्यमातून मांडण्यात आले. गणेशोत्सवात ज्ञानसत्रांतर्गत तीन दिवस मान्यवरांची व्याख्याने झाली.

## 'उत्कर्ष' युवा महोत्सव

यावर्षीचा युवा महोत्सव समितीच्या लजपतराय भवन वसतिगृहाच्या प्रांगणात उत्कर्ष २०२३ या नावाने ता. १७ ते १९ फेब्रुवारी दरम्यान झाला. प्रसिद्ध उद्योजक, कथालेखक शरद तांदळे व मैत्र संस्थेच्या संस्थापिका सौ. मेधा पुरकर यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. महोत्सवात सुमारे १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. अभिनेते प्रणव पिंपळकर व आनंद पिंपळकर यांच्या उपस्थितीत गुणगौरव सोहळा झाला. विद्यार्थी व्यवस्थापन मंडळाने उत्कर्ष महोत्सवाचे नियोजन केले.




## लॉ क्लबचे उद्घाटन

डॉ. आपटे वसतिगृहात २२ सप्टेंबरला Law Club चे (लॉ क्लब) डिजिटल स्वरुपात उद्घाटन प्रमुख पाहुण्या डॉ. सुप्रिया कोठारी यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. कोठारी यांनी वकील कसा असावा या विषयी मार्गदर्शन केले.

---

## माजी विद्यार्थी मंडळ उपक्रम

**मेळाव्यात ५५० माजी विदयार्थी सहभागी**

माजी विद्यार्थी– विद्यार्थिनींचा ३४ वा स्नेहमेळावा २६ फेब्रुवारीला लजपत भवनच्या प्रांगणात झाला. मेळाव्याला सुमारे ५५० विद्यार्थी उपस्थित होते. कार्यकर्त्या सुहासिनी बिवलकर, कर्मचारी संगीता गारवे, देणगीदार राजेंद्र गायकवाड यांचा सन्मान करण्यात आला. समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी माजी विद्यार्थ्यांच्या समितीबद्दलच्या कृतज्ञतेचे कौतुक केले. कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड यांनी समितीच्या भविष्यातील उपक्रमांचा, माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष राजू इंगळे यांनी मंडळाच्या भविष्यकालीन योजनांचा आढावा घेतला. अध्यक्ष म्हणून माजी विद्यार्थी दत्तप्रसाद रायकर तर प्रमुख पाहुणे म्हणून अशोक शहाणे उपस्थित होते. यावर्षीच्या मेळाव्याचे प्रायोजकत्व कोकण व मुंबई विभागातील माजी विद्यार्थ्यांकडे होते.

**माजी विद्यार्थिनींचा मेळावा**

माजी विद्यार्थिनींचा वार्षिक स्नेहमेळावा १८ सप्टेंबरला आपटे वसतिगृहात झाला. पुण्यात कामानिमित्त आल्यानंतर आवर्जून समितीत येऊ, समितीतील घडामोडींची माहिती घेऊन शक्य असेल ते योगदान देऊ, असा संकल्प माजी विद्यार्थिनींनी केला. कार्यक्रमाचे नियोजन अनिता देशपांडे व सुनीता पाटील यांनी केले.

# माजी विद्यार्थ्यांचे यश

## समितीमुळे उत्तरदायित्वाची जाण



माझे गाव नाशिक जिल्ह्यातील भऊर (ता. देवळा). शेतकरी कुटुंब असल्यामुळे त्या सर्व अडचणींशी सामना करत शिक्षण सुरू होते. प्राथमिक शिक्षण जव्हार (जि. ठाणे) तालुक्यात झाले. दहावीच्या परीक्षेत केंद्रात प्रथम क्रमांक मिळवला. पुढे विद्युत अभियांत्रिकीसाठी धुळ्यातील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये प्रवेश घेतला. ज्यात आठव्या क्रमांकाने ही पदविका संपादन केली. याच गुणवत्तेवर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात (सीओईपी) दुसऱ्या वर्षात प्रवेश मिळाला. मात्र होस्टेल मिळाले नाही. बाहेर राहणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नव्हते. त्यामुळे समितीकडे आलो. 'लजपत भवन' वसतिगृहात राहण्याची सोय झाली. 'कमवा व शिका मधून गरजेपुरते अर्थार्जन होते. १९८८ मध्ये विद्युत अभियांत्रिकी पदवी प्राप्त केली. समितीच्या वास्तव्यात स्वावलंबन, स्वयंशिस्त आणि व्यक्तिमत्त्व विकासासोबतच श्रमप्रतिष्ठा व सामाजिक बांधिलकीचे संस्कार झाले. १९८९ मध्ये महावितरणमध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून नोकरी मिळाली. सध्या पुण्यात परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यभार सांभाळत आहे. २००५ चा मुंबईतील महापूर, कोरोनाचा संसर्ग, महाभयंकर निसर्ग आणि तौक्ते चक्रीवादळाचे तडाखे यामध्ये विशेष कामगिरी करता आली. समितीच्या संस्कारातून समाजाप्रती उत्तरदायित्वाची जाण आणखी प्रगल्भ झाल्याने नोकरीच्या सुरुवातीपासूनच सामाजिक कार्यात सक्रिय आहे. अनाथ तसेच अंध व मूकबधीर मुलांना, वृद्धाश्रमातल्या ज्येष्ठांना संस्थांच्या माध्यमातून मदतीची बांधिलकी जपत आहे.

**राजेंद्र पवार,** मुख्य अभियंता, महावितरण पुणे, पुणे परिमंडळ

## जास्तीत जास्त देण्याचा प्रयत्न



मी मूळचा बीडचा, पण दुष्काळामुळे कामासाठी कुटुंब नगरमध्ये स्थलांतरित झाले. शिक्षणासाठी तितकी पैशांची सोय नव्हती. गावाकडे करियर आणि दहावीनंतर काय, हे सांगायलाही कोणी नव्हते. दहावीला ९१% मार्क पडले म्हणून गव्हर्नमेंट कॉलेजला डिप्लोमाला अँडमिशन घ्यायचे ठरवले. डिप्लोमा झाल्यावर डिग्रीसाठी पुण्यात नंबर लागला, पण राहण्याची सोय नव्हती. तेव्हा समितीने मला प्रवेश दिला. समितीच्या माध्यमातून शिष्यवृत्ती मिळाली म्हणून खर्चाचा ताण कमी झाला. आज मी एका मल्टीनॅशनल कंपनीत CSR अधिकारी म्हणून काम पाहतो. यात नक्कीच समितीचा वाटा मोठा आहे. समितीतून बाहेर पडल्यापासून मी समितीच्या कार्यात सहभागी आहे. माझ्या कंपनीच्या माध्यमातून मागील २ वर्षांपासून समितीच्या १०-११ मुलांना शिष्यवृत्ती दिली जात आहे. मुलांच्या वसतिगृहासाठी सोलरची व्यवस्था केली. मुलींसाठी नव्याने उभारल्या जात असलेल्या वसतिगृहासाठी यावर्षी कंपनीने ५० लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मी समितीच्या विद्यार्थ्यांशी संपर्कात असतो आणि अंकुर फौंडेशनमार्फत सिक्स सिग्माच्या माध्यमातून त्यांना लाईफ स्किल ट्रैनिंग देतो. उद्योग कौन्सिलचा मेंबर म्हणूनही जबाबदारी पाहणार आहे. समितीला माझ्याकडून जास्तीत जास्त देण्याचा माझा नक्की प्रयत्न असेल. समिती खरंच आमच्यासारख्या विद्यार्थ्यांसाठी एक कुटुंब आहे. समितीमुळे आयुष्यभर परिवारसारखी माणसे जोडली जातात.

**धनाजी पुरी,** सीएसआर अधिकारी, एपिरॉक मायनिंग इंडिया प्रा. लि.

## आचार- विचारांची बांधणी मजबूत करणारी समिती



समितीत मी १९८७-८८ मध्ये वास्तव्यास होते. समितीत योगासनांमुळे आरोग्य जपण्याचे भान, साफसफाईतून स्वच्छतेचा संस्कार, पालकांच्या भेटीतून ज्येष्ठांच्या संपर्कात राहून त्यांच्या विचारांचा अनमोल ठेवा आपलासा करणे, गटचर्चा उपक्रमातून व्यक्त होणे, स्वतःची मते ठामपणे मांडणे या गोष्टी शिकता आल्या. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांतून आपल्या संस्कृतीजतनाच्या वारीत सामील होत आपल्या आचार- विचारांची बांधणी मजबूत करण्याची संधी मिळाली. पुढे मी वकिल झाले. समुपदेशिका म्हणून कार्यरत झाले. ८ हजाराहून अधिक संसार समुपदेशनातून वाचवले. पनवेल येथे वास्तव्यास असताना पनवेल नगरीचा २००० वर्षांचा इतिहास शब्दबद्ध करून प्रकाशित केला. एका व्यक्तीने एका गावचा लिहिलेला हा बहुधा पहिलाच इतिहास. मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ सदस्या म्हणूनही काम केले. सध्या केंद्र सरकारच्या 'सखी एक थांबा केंद्र' या पुण्यात सुरू असलेल्या पायलट प्रोजेक्टच्या व्यवस्थापन समितीवर सदस्या म्हणून कार्यरत आहे. पुणे पोलीस आयुक्तालयातील भरोसा सेलमध्ये समुपदेशिका म्हणून बरीच वर्षे काम केले. स्त्री सक्षमीकरणासाठी सावित्रीबाई फुले राष्ट्रीय पुरस्कार लाभला आहे. वक्तृत्व, वादविवाद, काव्यलेखन, काव्यवाचन यासाठी आणि साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यासाठी विविध पुरस्कारांनी सन्मानित आहे. काही पुस्तके प्रकाशित आहेत. राजकीय, सांस्कृतिक, साहित्यिक, सामाजिक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन केले. 'बंदिशाळा' या मराठी चित्रपटातील अभिनेत्री सविता प्रभुणे यांनी साकारलेल्या वकिलाच्या व्यक्तीरेखेला माझे नाव देण्यात आले. असा समितीच्या विद्यार्थिनीच्या वाट्याला हा सन्मान प्राप्त झाला.

**डॉ. प्रार्थना सदावर्ते**, कौटुंबिक समस्यांसाठी समुपदेशिका, पुणे

## समितीच्या उपक्रमांमुळे सावरता आले



जुन्नर तालुक्यातील उंचखडक या खेड्यात (की जिथे वीज, पाणी, रस्ते यांची सुविधा नव्हती) माझा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण तिथेच झाले. १९८८ ला दहावीत पुणे जिल्ह्यात मुलींमध्ये प्रथम आले. पुढील शिक्षणासाठी पुण्यात आले. १९८८ ते १९९० या शहरी जीवनात आधुनिक स्वावलंबन आणि शिक्षणातील आव्हानांना सामोरे जाताना विद्यार्थी साहाय्यक समितीचा खूप मोठा आधार मिळाला. योगासने, सूर्यनमस्कार, कमवा व शिका, पालकत्व योजना इ. उपक्रमांतून स्वतःला सावरले. पुढे डीएड करून प्राथमिक शिक्षिका म्हणून सेवेचा श्रीगणेशा केला. आकाशवाणी, बालचित्रवाणी यांसाठी संहिता लिहिता लिहिता नाट्यलेखन, कविता, ललित इ. दालनांसाठी साहित्यनिर्मिती केली. एकूण ४ पुस्तके प्रकाशित आहेत. अभ्यासाच्या आवडीतून पीएचडी पदवीही संपादित केली. त्याचा विषय - श्री ज्ञानदेवरचित हरिपाठाचा विवेचक अभ्यास असा होता. आजपर्यंत माझ्या एकूण ४४ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीमध्ये स्थान पटकावले आहे. शाळा, महाविद्यालये, ज्येष्ठ नागरिक संघटना, अखंड हरिनाम सप्ताहांमधून प्रबोधनात्मक व्याख्याने असे उपक्रम सुरू आहेत.

**डॉ. लता मुळे पाडेकर**, शिक्षिका

# साहाय्यदाते म्हणतात

## स्पर्धेच्या जगात विद्यार्थ्यांना सक्षम करणारी समिती

गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी कार्यरत अशा या संस्थेची ओळख माझे काका, स्व. रवींद्र भट यांनी करून दिली होती. ते समितीच्या कार्याशी अनेक वर्षे जोडलेले होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी समितीच्या कामात पूर्णपणे झोकून दिलेले होते. खेड्यापाड्यातल्या हुशार मुला-मुलींना शिकायला मिळावे, त्यांना संगणकाची ओळख व्हावी, मोठ्या शहरामधे राहून, काम करून आत्मविश्वास वाढावा अशी त्यांची धडपड होती. मी त्यांच्या या निःस्वार्थ आणि सामाजिक प्रभावी कार्याची प्रेरणा घेतली. त्यांनीच मला समितीच्या पालकत्व योजनेत देणगी देण्यास सुचवले. समितीतील मुला-मुलींना ३-४ वर्षे या योजनेमार्फत जवळून भेटता आले. त्यांचा संघर्ष व त्यांच्या कष्टाळू वृत्तीने मी खूप प्रभावित झाले. कठीण परिस्थितीत देखील, हसतमुखाने ही मुले समितीचा हात धरून स्पर्धेच्या या जगात आपले पाऊल सक्षम होऊन पुढे टाकताना बघून मला फार आनंद आणि समाधान मिळाले.

समितीचे हे काम बघून जेव्हा आमच्या कंपनीमध्ये CSR Funds चे बजेट माझ्या पुढे ठेवण्यात आले, तेव्हा कंपनीच्या समाजकल्याणासाठी ठेवलेल्या या बजेटसाठी सर्वात योग्य अशी संस्था म्हणून अर्थातच मी विद्यार्थी साहाय्यक समितीचे नाव सुचविले. स्व. रवींद्र भट आणि आमच्या कंपनीचे संस्थापक स्व. हेमंत भट यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ मे. एच.एन.बी. इंजिनियर्सने ७० लॅपटॉपची देणगी समितीला दिली. या आमच्या योगदानाचा मुला मुलींना नक्कीच फायदा होईल, ही खात्री आहे.

समितीने याचप्रमाणे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना मदत करावी. त्यांना सक्षमपणे ही सामाजिक जबाबदारी पार पाडण्यासाठी आमच्यासारखे अनेक उद्योजक नक्कीच साथ देतील, असा विश्वास आहे.


**सुवर्णा जोशी**
एचएनबी इंजिनिअर्स

## विश्वस्तांना स्पष्ट दृष्टी

विद्यार्थी साहाय्यक समितीला ६५ वर्षांहून अधिक काळाचा वारसा आहे आणि त्यांनी तो आजपर्यंत जपला आहे. इथे पूर्ण प्रोफेशनल पद्धतीने काम केले जाते. सर्व विश्वस्तांना विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी लागणारी स्पष्ट दृष्टी आहे. इथे विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया अत्यंत पारदर्शक आहे. समिती केवळ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिकच नव्हे तर सर्वांगीण विकासावरही भर देते आणि त्यांना समाजाचे जबाबदार नागरिक बनवते. समितीच्या कामाचे समाजावर होणारे परिणाम दिसून येणारे आहेत असे आम्हाला आढळले.

**सीएसआर टीम**
फ्रॅन्के फेबर

## व्यक्तिमत्त्व विकासाचे अंगण देणारी संस्था



मकरंद फडके आणि तुकाराम गायकवाड ह्यांच्या पाठपुराव्यामुळे २०२३ च्या सुरवातीला विद्यार्थी सहाय्यक समितीच्या पुण्यातल्या वसतिगृहाला भेट देण्याचा योग आला. ह्या भेटीत विद्यार्थी सहाय्यक समितीचे कार्य प्रत्यक्ष बघता आले. वसतिगृहाचा स्वच्छ परिसर, विद्यार्थिनींच्या बरोबरच्या संवादात त्यांना संस्थेबद्दल वाटणारी आत्मियता, त्यांचा हसरा चुणचुणीतपणा आणि प्रामुख्याने ह्या संस्थेला सांभाळणाऱ्या कार्यकर्त्यांच्या भेटीत त्यांची निरलसता आणि कळकळ अनुभवता आली. ग्रामीण भागातल्या मुलांना आणि विशेषकरून मुलींना शहरात विद्यार्जन करताना नुसताच सुरक्षित निवारा नाही, तर व्यक्तिमत्त्व विकासांचे आंगण दिल्याबद्दल समितीचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा!

**राजीव भालेराव,** अध्यक्ष, महाराष्ट्र फाउंडेशन, न्यूयॉर्क (अमेरिका)

## चांगल्या संस्थेशी कनेक्ट असल्याचा आनंद



'गर्जे मराठी' आणि 'विद्यार्थी साहाय्यक समिती' यांच्यामध्ये जो काही संबंध निर्माण झाला आहे तो खरोखरच प्रोडक्टिव्ह होतो आहे. आम्हालाही समितीच्या लोकांना भेटताना, समितीबरोबर काम करताना एकूणच आपल्या परिश्रमाचे चीज होते आहे असे वाटते. अतिशय चांगल्या संस्थेशी आपण कनेक्ट आहोत याचा आम्हाला आनंद मिळतो. सुनील कुलकर्णी नुकतेच समितीत येऊन गेले. तेही गर्जे मराठीचे जुने सभासद आहेत. त्यांनीही हेच सांगितले की, मलाही समितीत जाऊन खूप आनंद मिळाला. आम्हालाही तोच आनंद होतो आहे. विद्यार्थी साहाय्यक समितीचे जे काम आहे त्यात प्रतापराव पवार असतील, तुकाराम गायकवाड असतील, डॉ. ज्योती गोगटे मॅडम असतील किंवा इतर सगळे, मी जेव्हा तेथे आलो होतो त्या भेटीमध्येसुद्धा तुमच्या सगळ्यांचे डेडिकेशन, काम करायची इच्छा, संस्थेवरचे प्रेम पाहून आम्हाला सुद्धा उत्साह आला. अँज अ मॅटर ऑफ फॅक्ट समितीचे काम पाहताना आम्ही गर्जे मराठीमध्ये विचार करतो की, गोइंड अहेड पंचवीस-तीस वर्षांनी आपण समितीसारखे दिसलो पाहिजे. आपण समितीसारखा लोकांना फायदा केलेला असला पाहिजे. आम्हाला समितीबरोबर अनेक उपक्रम करायचे आहेत. एकलव्य, क्रिएटिव्ह कोडिंग, सॉफ्टस्किल्स, फ्लंटर किंवा वेब डेव्हलपमेंट यासारखे जे उपक्रम असतील ते आम्हाला करायचे आहेत. दुसरा एक मनात विचार आहे की, डिजिटल लिटरसी किंवा फायनान्शियल लिटरसी यावर आपण जोर द्यायचा आहे आणि आपल्या सगळ्या विद्यार्थ्यांना एंटरप्रिनर कसे बनता येईल यादृष्टीने आपण एकत्र मिळून प्रयत्न करायचे आहेत. समितीकडे अनेक मोठमोठे एंटरप्रिनर्स आहेत आणि आमचे चेंबर्सचे जे एंटरप्रिनर आहेत ते जेव्हा केव्हा पुण्याला येतील तेव्हा त्यांना पुण्यात, नगरला सतत जाऊन तुमच्या विद्यार्थ्यांसोबत राहायला आवडेल. तुमच्या वर्षानुवर्षे होणाऱ्या प्रगतीला आमच्याकडून थोडाफार हातभार लावता येईल असा आमचा प्रयत्न आहे. या निमित्ताने या कार्याला मनःपूर्वक शुभेच्छा.

**आनंद गानू,** संस्थापक अध्यक्ष, गर्जे मराठी, अमेरिका

# AUDITED FINANCIALS
# VIDYARTHI SAHAYYAK SAMITI, PUNE

Registration No. : E-219  PAN: AAATS4498N

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT 1950, SCHEDULE IX [Vide Rule 17 (1)]

Income & Expenditure for the Year Ending 31st March 2023

| 2021-22 | Expenditure | 2022-23 | 2021-22 | Income | 2022-23 |
|---|---|---|---|---|---|
| | **Expenditure in respect of properties** | | 736,032 | Rent | 890,745 |
| 1,021,788 | Rates, Taxes, cesses | 1,181,357 | | **Interest** | |
| 22,079,282 | Major Repair | 11,741,087 | 7,377,258 | On Bank Account. - on deposits. | 6,977,882 |
| 1,386,662 | Salaries & Terminal Benefit | 1,712,609 | 133,260 | - on saving a/c. | 160,402 |
| 1,462,040 | Establishment Expenses | 1,712,309 | -- | | |
| -- | Legal Expenses. | 315,750 | 12,314,327 | Donation in cash or kind | 55,824,742 |
| 20,000 | Audit fees & Professional fees | 28,320 | 8,233,762 | Income from other sources | 21,963,196 |
| | | | 1,674,423 | Transfers from Reserves/ Liabilities | 447,371 |
| 4,290,757 | Depreciation | 4,648,055 | | | |
| -- | Transferred to Reserve / Specific Funds. | | 13,241,453 | Deficit c/f to Balance Sheet | -- |
| | **Expenses on object of trust** | | | | |
| 13,012,302 | Educational / Relief to poor | 23,151,637 | | | |
| 437,684 | Medical Relief | 602,298 | | | |
| | Surplus c/o to Balance Sheet- # | 41,170,916 | | | |
| **43,710,515** | **Total** | **86,264,338** | **43,710,515** | **Total** | **86,264,338** |

As per our Report on Even date

Dated : 31st August 2023

Place: PUNE

| Tushar Ranjankar | Prataprao G. Pawar | CA Santosh Pethe |
|---|---|---|
| Managing Trustee | President | Torvi Pethe & Co |

# Surplus is represented by specific donations received towards 3 ongoing hostel projects with expected outlay of about Rs. 45 Cr (Refer Page 27)

# AUDITED FINANCIALS
# VIDYARTHI SAHAYYAK SAMITI, PUNE

Registration No. : E-219 PAN: AAATS4498N

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT 1950, SCHEDULE IX [Vide Rule 17 (1)]

BALANCE SHEET AS ON 31st March 2023

| 31/03/2022 | Funds & Liabilities | 31/03/2023 | 31/03/2022 | Property & Asstes | 31/03/2023 |
|---|---|---|---|---|---|
| | **Trust funds or Corpus** | | 45,632,721 | Immovable Properties | 90,543,967 |
| 98,544,060 | Trust funds or Corpus | 107,913,599 | 11,026,460 | Furniture & Fixture. | 15,928,389 |
| 103,812,993 | Other Earmarked Funds | 146,589,288 | 144,066,960 | Investments. | 190,519,130 |
| | **Liabilities** | | 4,299,952 | Advances | 5,601,928 |
| 2,942,949 | For Expenses | 4,179,064 | | | |
| 1,083,518 | For Advances-OD | 4,410,850 | 257,441 | Income Outstanding - Mess Closing Stock | 152,497 |
| | Income and Expenditure Account | | | **Cash & Bank Balance** | |
| (603,295) | **Bal as per last Bal. Sheet:** | (603,295) | 484,478 | Saving Account | 389,120 |
| | Add : Surplus | 41,170,916 | 12,213 | Cash in hand | 1,871 |
| | Less: Deficit current year | -- | | | |
| | Less:Trf to Repairs/Reserve Fund | (523,520) | | | |
| **205,780,225** | **Total** | **303,136,902** | **205,780,225** | **Total** | **303,136,902** |

As per our Report on Even date

Dated : 31st August 2023

Place: PUNE

| Tushar Ranjankar | Prataprao G. Pawar | CA Santosh Pethe |
|---|---|---|
| Managing Trustee | President | Torvi Pethe & Co |

# ऑडिट रिपोर्ट

To
**The Board of Trustees,**
Vidyarthi Sahayyak Samiti,
1184/1/4 F.C. Road,
Pune 411 005.

As per our appointment, we have audited the attached Balance Sheet of Vidyarthi Sahayyak Samiti as at March 31, 2023 and also the Income and Expenditure Account for the year ended on that date annexed thereto. These financial statements are prepared by incorporating the accounts of the Trust.

These financial statements are the responsibility of the Management. Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. We have conducted our audit in accordance with auditing standards generally accepted in India. These standards require that we plan and perform the audit to obtain the reasonable assurance about whether the financial statements are free of material misstatements. An audit includes examining evidence supporting the amounts and disclosures in the financial statements. An audit also includes assessing the accounting principles used and significant estimates made by the management, as well as evaluating the overall financial statement presentation. We believe that our audit provides a reasonable basis for our opinion.

**We further report that:**

a) We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and belief were necessary for the purposes of our audit.
b) The Balance Sheet and Income & Expenditure Account dealt with by this report are in agreement with the books of account.
c) In our opinion, the Trust has kept proper books of account as required by law so far as it appears from our examination of these books.
d) In our opinion the Balance Sheet and Income & Expenditure Account comply with relevant Accounting Standards, exceptions mentioned in respect AS-9 on Revenue Recognition.

In our opinion and to the best of our information and according to the explanation given to us, these financial statements together with the schedules attached thereto and read with the Accounting Policies and Notes Forming Part of the Accounts give a true and fair view in conformity with the Accounting Principles generally accepted in India :

i] In case of Balance Sheet, of the state of affairs of the Trust as at March 31, 2023.
ii] In case of Income & Expenditure Account, of the Surplus / (deficit) for the year ended on that date.

Date : 31st August 2023
Place : Pune

**CA Santosh Pethe**
Partner- M.No. 104973
Torvi Pethe and Company

# आमचे कॉर्पोरेट क्षेत्रातील साहाय्यदाते

एपिरॉक मायनिंग इंडिया लि.
भारत फोर्ज लि.
बीवायके इंडिया प्रा. लि.
डेक्कन मेकॅनिकल अँड केमिकल इंडस्ट्रिज प्रा. लि. (डिमेक)
डेलवाल फ्लो कंट्रोल्स प्रा. लि.
फिडेल सॉफ्टटेक लि.
फ्रॅन्के फेबर इंडिया प्रा. लि.
एचएनबी इंजिनिअरिंग प्रा. लि.
जगदीश आगाशे फायनान्सिंग कंपनी प्रा. लि.
कल्याणी टेक्नोफोर्ज लि.
सिपोरेक्स इंडिया प्रा. लि.
साबा सॉफ्टवेअर (इं.) प्रा. लि.
टेक्नोफोर इलेकट्रॉनिक्स प्रा. लि.
पर्सिस्टंट फाउंडेशन,
सावा हेल्थकेअर लि.
सोनाई दूध कंपनी लिमिटेड, इंदापूर
यामाझाकी मझाक इंडिया प्रा. लि.

## आर्थिक मदत देणारे ट्रस्ट

स्वाधार
दिशा परिवार
वर्धमान ट्रस्ट
ए. यु. एम. चॅरिटेबल ट्रस्ट
सुपर्णा चॅरिटेबल ट्रस्ट
एस. टी. भटेवरा फाउंडेशन
शिवसह्याद्री चॅरिटेबल ट्रस्ट
विश्वकर्मा पर्पल एज्युकेशन ट्रस्ट
लेंड अ हॅण्ड इंडिया
महाराष्ट्र फाउंडेशन
हेमलता विनायक फाउंडेशन फॉर सोशल वेलफेअर
गिरिलता पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट
लिमये गंगा मोरेश्वर ट्रस्ट फंड
पंढरीनाथ गोपाळ ठकार एज्युकेशन ट्रस्ट
पाटण एज्युकेशनल अँण्ड डेव्हलपमेंट ट्रस्ट
सावली चॅरिटेबल ट्रस्ट
स्नेहसेवा
आत्मजा फाउंडेशन
एन. जी. भोसले ट्रस्ट
एज्युकेट वन वर्ल्ड इ. व्ही.
मराठवाडा मित्रमंडळ
लीला पूनावाला फाउंडेशन
शंकरराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट
शिवाजीनगर महिला मंडळ विद्यार्थी निधी
शुटिंग स्टार्स फाउंडेशन
उत्तुर सर्वोत्तम शेणॉय मेमोरिअल फाउंडेशन
अभियांत्रिकी महाविद्यालय विद्यार्थी साहाय्यक संस्था
कै. वसंत आणि मंगला कुलकर्णी मेमोरिअल ट्रस्ट
स्वादी चॅरिटेबल ट्रस्ट
लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट
सेवा सहयोग फाउंडेशन
देवी चतु:श्रृगी मंदिर ट्रस्ट

# आमचे नेतृत्व

## कार्यकर्ता मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| अरुणा अत्रे | अनिल खेतमाळीस | अनिल कुलकर्णी | अंकुश तळेकर |
| चंद्रशेखर दांडेकर | ज्ञानेश्वर खैर | दिनकर वैद्य | गणेश कळसकर |
| गणेश काळे | हरीष अष्टेकर | हरिष पाटणकर | हेमंत राजहंस |
| जिभाऊ शेवाळे | मधुसूदन बडवे | मनोज गायकवाड | मनिषा गोसावी |
| मकरंद जोगळेकर | मेधा पंडित | निसार चौगुले | नंदकुमार देशपांडे |
| नंदकुमार तळेकर | प्रीती गोखले | प्रदीप मांडके | प्रकाश टेके |
| प्रभाकर वाल्हेकर | रवींद्र देशपांडे | रमा देसाई | रमेश घोटीकर |
| रत्नाकर मते | रवींद्र नामजोशी | राजेंद्र तातार | संजय अमृते |
| सुहासिनी बिवलकर | शशी भाटे | सुभाषचंद्र भोसले | सुनिल चोरे |
| सोपान गोंटला | श्रीधर कुलकर्णी | श्यामला जोशी | सुप्रिया केळवकर |
| सुनंदा पाटील | स्नेहा फडके | सुधीर राजगुरु | सुनिता झिंजाड |
| सुनील शास्त्री | तुकाराम गायकवाड | तुषार रंजनकर | उषा पालेकर |
| वासंती नाटेकर | | | विनया ठोंबरे |

## सन्माननीय कार्यकर्ते

| | | | |
|---|---|---|---|
| प्रदीप तळवलकर | नामदेव खमितकर | प्रकाश अकोलकर | अशोक पाथरकर |

## सल्लागार मंडळ यादी

| | | |
|---|---|---|
| प्राचार्य भाऊसाहेब जाधव (अध्यक्ष) | सुप्रिया केळवकर (कार्यवाह) | मेधा पंडित |
| डॉ. प्रकाश दीक्षित | डॉ. (कॅ.) चंद्रशेखर चितळे | डॉ. एस. व्ही. वाघमारे |
| सुनंदा माने | तेज निवळीकर | प्राचार्य व्ही. आर. राव |
| डॉ. रवींद्रसिंह परदेशी | प्राचार्य देविदास गोल्हार | प्राचार्य विठ्ठल बांदल |
| उल्का कळसकर | ज्योत्स्ना एकबोटे | प्राचार्य पी. बी. बुचडे |
| प्राचार्य संजय चाकणे | डॉ. वैशाली साकोरे | डॉ. ज्योती गोगटे |
| अरुणा औटी | | प्रा. संजय खरात |

## सन्माननीय

| | | | |
|---|---|---|---|
| डॉ. ए. डी. शाळीग्राम | प्रा. सुरेश तोडकर | डॉ. डी. आर. नंदनवार | डॉ. एन. एस उमराणी |

## मुख्य कार्यकारी अधिकारी

चंद्रकांत कुलकर्णी

## खजिनदार

संजय अमृते

# समितीच्या कार्यात आपण अशा प्रकारे सहभागी होऊ शकता

- सामान्य किंवा विशिष्ट कॉर्पससाठी (उदा. इमारत निधी) देणगी देणे.
- ७५० विद्यार्थ्यांच्या एकावेळच्या भोजनासाठी येणारा रु. ११८०९ इतका तुटवडा भरून येण्यासाठी अन्ननिधी योजनेखाली देणगी देणे.
- समितीला प्रत्येक विद्यार्थ्यामागे एका वर्षात येणारी रु. ३०,००० इतकी तूट भरून येण्यासाठी एका विद्यार्थ्याचा खर्च उचलणे / मार्गदर्शक / पालक होणे.
- समितीतील हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.
- समितीला उपयोगी पडतील अशी उपकरणे /वस्तू / पुस्तके यांची भेट देणे.
- समितीच्या कमवा व शिका योजनेखाली एका किंवा जास्त विद्यार्थ्यांना काम देणे.
- CSR/ संस्थात्मक आर्थिक मदत मिळवून देणे.
- समितीचा कार्यकर्ता म्हणून कार्याला वेळ देणे.
- विद्यार्थी विकास केंद्राच्या उपक्रमात विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त किंवा महत्त्वाच्या विषयांवर व्याख्यान देणे.

---

# गरज आहे आपल्या मदतीची



**पुण्यातील मुलींचे वसतिगृह**
एकूण खोल्या ११२
**विद्यार्थिनी संख्या ३३६**



**म. कृ. ऊर्फ मधुकर चौधरी**
**मुलांचे वसतिगृह, अहमदनगर**
एकूण खोल्या २०
**विद्यार्थिनी संख्या ६०**



**कल्याणराव जाधव**
**मुलांचे वसतिगृह, अहमदनगर**
एकूण खोल्या ४०
**विद्यार्थी संख्या १२०**

सध्या समितीची पुण्यात पाच वसतिगृहे असून ७५० विद्यार्थी (४३० मुले, ३२० मुली) समितीच्या सेवांचा लाभ घेत आहेत. ग्रामीण भागातून पुण्यासारख्या शहरात शिकायला येणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या वाढते आहे. पालक त्यांना उच्च शिक्षणासाठी पाठवत आहे, हा समाजातील एक सकारात्मक बदल आहे. परंतु पुण्यासारख्या शहरातील खर्च त्यांना परवडणारा नसतो. त्यामुळे परवडणारा दर आणि सुरक्षितता यामुळे समितीकडे येणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या गेल्या काही वर्षात वाढते आहे. त्यावर मार्ग काढण्यासाठी नव्याने वसतिगृह इमारतींचे बांधकाम सुरू केले आहे. या सर्व प्रकल्पांसाठी साधारण ४५ कोटी रुपयांचा खर्च आहे. आपण वैयक्तिक किंवा आपल्या संपर्कातून यासाठी हातभार लावल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थिनींचे उच्च शिक्षणाचे स्वप्न साकार होणार आहे.

या सर्व इमारतींमध्ये ग्रंथालय, संगणक कक्ष, योगासन हॉल, भोजनालय हॉल अशा सुविधा आहेत. यासाठी आपण देणगी देऊ शकता. तसेच प्रत्येक खोलीसाठी रु. १० लाख रुपये देणगी देऊन खोलीला नाव देण्याची सुविधा उपलब्ध आहे. ही देणगी तीन वर्षांमध्ये आपण देऊ शकता की, ज्याचा फायदा आपल्याला आयकर सवलतीसाठी घेता येऊ शकेल.

## विद्यार्थी साहाय्यक समिती, पुणे

(Public Charitable Trust No. E- 219 Pune)

११८२/१/ ४, शिवाजीनगर, फर्ग्युसन कॉलेज रस्ता, हॉटेल ललित महल चौक,
एचडीएफसी बँकेच्या मागे,पुणे – ४११००५
E mail - info@samiti.org website - www.samiti.org,
Mob– 9404855530

Donations may be made by cheque drawn in favour of
VIDYARTHI SAHAYYAK SAMITI, PUNE
Donations given are eligible for deduction
under sec. 80 G of Income Tax Act.

Pan No. AAATS4498N

समितीला देणगी देण्यासाठी बँकेची माहिती
स्थानिक (भारतातील) देणगीदारांसाठी
ICICI Bank : A/C No.000501060326
IFSC : ICIC0000039
Branch : Shivajinagar, Pune

## परदेशस्थ (NRI) देणगीदारांसाठी

State Bank Of India, Main Branch, New Delhi
A/C No. 40282102047 (FCRA Saving Account)
Branch Code - 00691
IFSC : SBIN0000691
SWIFT CODE : SBININBB104

आपण देणगी ऑनलाइन जमा केल्यावर पावतीसाठी आपला पॅन नंबर, पत्ता,
मेल आयडी व फोन ही माहिती समितीला info@samiti.org या मेलवर कृपया, कळवावी.